## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नासिक.

दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता महामंडळाचे मा.अध्यक्ष, तथा मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक, रावसाहेब थोरात सभागह, गंगापूररोड, नाशिक येथे संपन्न झालेल्या सन २०२१-२२ च्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सभेस खालील प्रमाणे सन्माननिय संचालक उपस्थित होते.

| अ.नं. | संचालक सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.डॉ.श्री.विजयकुमार गावित, मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २. | मा.श्री.प्राचार्य वसंत चि. पुरके | उपाध्यक्ष |
| ३ | मा.श्री. भरतलाल थुकेलसिंग दुधनाग | संचालक |
| ४ | मा.श्री.अशोक भाऊराव मंगाम | संचालक |
| ५ | मा.श्री. सुनिल चंद्रकांत भुसारा | संचालक |
| ६ | मा.श्री.धनराज हरीभाऊ महाले | संचालक |
| ७ | मा. श्री. विकास दुलाजी वळवी | संचालक |
| ८ | मा. श्री. मधुकर निंबाजी काठे | संचालक |
| ९ | मा. श्री. विठ्ठल देवराम देशमुख | संचालक |
| १० | मा. श्री. मगन नुरा वळवी | संचालक |
| ११. | मा.श्री. प्रकाश तुळशिराम दडमल | संचालक |
| १२. | मा. श्रीमती मिनाक्षी अर्जुनराव वट्टी | संचालिका |
| १३. | मा. श्रीमती जयश्री नामदेव तळपे | संचालिका |
| १४. | मा.श्रीमती ताराबाई शंकर माळेकर | संचालिका |
| १५. | मा.आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक | संचालक |
| १६. | मा.सहनिबंधक, सहकारी संस्था, आदिवासी विकास, नासिक | संचालक |
| १७. | श्री.अमोल धुर्वे, कर्मचारी संघटना प्रतिनिधी | संचालक |
| १८. | श्री.गणेश सुकाळे, कर्मचारी संघटना प्रतिनिधी | संचालक |
| १९. | मा.श्री.दीपक सिंगला, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक तथा आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक | सदस्य सचिव |

त्याचप्रमाणे सभेस खालील प्रमाणे आदिवासी विविध कार्यकारी सहकारी, संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपस्थित संस्था प्रतिनिधी.

| अ. क्र. | सभासद क्रमांक | संस्था प्रतिनिधीचे नांव | संस्थेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १) प्रादेशिक कार्यालय, जव्हार | | | | | |
| ०१. | ०१ | श्री.शांताराम जानू मोहनकर | साकूर | जव्हार | पालघर |
| ०२. | ०९ | श्री.जानु राघो कामडी | जव्हार | जव्हार | पालघर |
| ०३. | १२ | श्री.मोहजन बल्यु पडवले | कोरतड | जव्हार | पालघर |
| ०४. | १३ | श्री.पांडूरंग गोपाल भोये | वसुरी | विक्रमगड | पालघर |
| ०५. | १४ | श्री.बाळू शिवराम वलके | आंबेघर | विक्रमगड | पालघर |
| ०६. | १५ | श्री.काशिनाथ लहू पाडवी | साखरे | विक्रमगड | पालघर |
| ०७. | १६ | श्री.बाबु राम खटाळ | दादडे | विक्रमगड | पालघर |
| ०८. | २० | श्री.राजू अमत सुतार | उपराळे | विक्रमगड | पालघर |
| ०९. | २४ | श्री. भिका बुधाजी माळी | मोखाडा | मोखाडा | पालघर |
| १०. | २९ | श्री. सुनिल | मो-हांडा | | पालघर |
| ११. | ७५ | श्री. गणपत पांडूरंग पाटील | ब-हाणपूर | डहाणू | पालघर |
| १२. | ९४ | श्री. योगेश आत्मारात निपुर्ते | शहापूर | शहापूर | ठाणे |
| १३. | ९५ | श्री. शंकर सोमा कातवारे | पिवळी | शहापूर | ठाणे |
| १४. | १०४ | श्री. मच्छिंद्र कारभारी ढिगळे | खडी | शहापूर | ठाणे |
| १५. | १०७ | श्री. कैलास उंदरु भोईर | वाशाळा | शहापूर | ठाणे |
| १६. | १०९ | श्री. पांडूरंग शंकर माळे | पळशिन | शहापूर | ठाणे |
| १७. | ११३ | श्री. चितामण लहू वाळकोळी | दुधनोली | मुरबाड | ठाणे |
| १८. | ११४ | श्री. धर्मराज वाळकू निर्मळ | सोसाविळे | मुरबाड | ठाणे |
| २) प्रादेशिक कार्यालय, नाशिक | | | | | |
| १९. | १४० | श्री.सदाशिव रामा गावित | वणी | दिंडोरी | नाशिक |
| २०. | १४३ | श्री. वामन विठ्ठल राऊत | चौसाळे | दिंडोरी | नाशिक |
| २१. | १४६ | श्री. पुंडलिक नाना चौधरी | पिंपरखेड | दिंडोरी | नाशिक |
| २२. | १४७ | श्री. संजय नारायण हिंडे | ननाशी | दिंडोरी | नाशिक |
| २३. | १५८ | श्री. कस्तुरे पोपट मुरलीधर | हरसुल | त्र्येबकेशवर | नाशिक |
| २४. | १५९ | श्री. बाळु रामा चिलाटे | कोटंबी | | नाशिक |
| २५. | १६० | श्री. रामदास सोमा लहारे | शिरसगाव | त्र्येबकेशवर | नाशिक |
| २६. | १६३ | श्री. वैभव बाळा दिवे. | (गिरणारे) वडगाव | | नाशिक |
| २७. | १६४ | श्री. अमता किरु डहाळे | गणेशगांव | | नाशिक |
| २८. | १६५ | श्री. किरण पंढरीनाथ डाके | तळेगाव | | नाशिक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९. | १६६ | श्री. नामदेव शिवराम बुरंगे | सापगाव | | नाशिक |
| ३०. | १६७ | श्री. नवनाथ महादु कोढूळे | त्र्यंबकेशवर | त्र्यंबकेशवर | नाशिक |
| ३१. | १६८ | श्री. जयवंत किरण जाधव | आंबाई | | नाशिक |
| ३२. | १७४ | श्री. पांडूरंग अनंता मोहोर | आंबे | पेठ | नाशिक |
| ३३. | १७६ | श्री. मोहन महादू गावंडे | करंजाळी | पेठ | नाशिक |
| ३४. | १७७ | श्री. सुधाकर धोंडीराम राऊत | बोरवट | पेठ | नाशिक |
| ३५. | १७८ | श्री. नामदेव किशन चौधरी | कोहोर | पेठ | नाशिक |
| ३६. | १७९ | श्री. गणपत पंढरीनाथ चौधरी | आड बु. | पेठ | नाशिक |
| ३७. | १८० | श्री. संतोष बाबुराव ठोमे | पेठ | पेठ | नाशिक |
| ३८. | १८१ | श्री. सदू मोतिराम मानभाव | कुभाळे | पेठ | नाशिक |
| ३९. | १८२ | श्री. रामचंद्र तुळशिराम भुसारे | आडगाव | | |
| ४०. | १८३ | श्री. विजय जगन्नाथ थेट | घोडेगाव | नाशिक | नाशिक |
| ४१. | १८४ | श्री. बाबुराव विठ्ठल दाबाडे | ओझरखेड | नाशिक | नाशिक |
| ४२. | १८५ | श्री. महादू भावडू नाटाळे | वाघेरा | नाशिक | नाशिक |
| ४३. | १८६ | श्री. कान्हू संजू खोटे | रोहिले | नाशिक | नाशिक |
| ४४. | १९० | श्री. गोविंद सावळीराम भोईर | बारसिंगवे | इगतपुरी | नाशिक |
| ४५. | १९३ | श्री. पांडूरंग डुभा आगिवाले | खेड | इगतपुरी | नाशिक |
| ४६. | १९४ | श्री. सोनु भाऊ शिंदे | गिरणारे | इगतपुरी | नाशिक |
| ४७. | १९७ | श्री. मच्छिंद्र बुधा झुगरे | नांदगाववसदो | इगतपुरी | नाशिक |
| ४८. | १९८ | श्री. दौलत चंद्र भगत | पिंप्रीसदो | इगतपुरी | नाशिक |
| ४९. | १९९ | श्री. समाधान कुडलिक कोकणी | आडवण | इगतपुरी | नाशिक |
| ५०. | २०० | श्री. ज्ञानेश्वर पंढरीनाथ कडाळी | खंबाळे | इगतपुरी | नाशिक |
| ५१. | २०२ | श्री. सोनु सोमा खडके | खैरगाव | इगतपुरी | नाशिक |
| ५२. | २०३ | श्री. प्रभाकर सखाराम इचम | वाळविहिर | इगतपुरी | नाशिक |
| ५३. | २०५ | श्री. भारत पंढरिनाथ कोकणे | कुणोली | इगतपुरी | नाशिक |
| ५४. | २०७ | श्री. शिवराम शंकर झोले | टाकेद बु. | इगतपुरी | नाशिक |
| ५५. | २१० | श्री. प्रकाश त्र्यंबक गव्हाणे | कांचनगाव | इगतपुरी | नाशिक |
| ५६. | २११ | श्री. आबाजी नाना घारे | काळुस्ते | इगतपुरी | नाशिक |
| ५७. | २१२ | श्री. ओमानंद हुशार घारे | भखडा | इगतपुरी | नाशिक |
| ५८. | २१३ | श्री. रघुनाथ नाना तोकडे | आंबेगाव | इगतपुरी | नाशिक |
| ५९. | २१४ | श्री. रमेश दत्तु गारे | सामुंडी | इगतपुरी | नाशिक |
| ६०. | २३३ | श्री. बळीराम सोमा गावित | ओतुर | कळवण | नाशिक |
| ६१. | २३६ | श्री. रामदास आनंदा बागुल | विठेवाडी (पा) | कळवण | नाशिक |
| ६२. | २४२ | श्रीम. ताराबाई माणिक पवार | पाटविहिर | कळवण | नाशिक |
| ६३. | २४६ | श्री. लक्ष्मण मुरलीधर गायकवाड | देवळी(वणी) | कळवण | नाशिक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६४. | २४७ | श्री. आप्प भिका ठाकरे. | आंबुर्डी बु. | कळवण | नाशिक |
| ६५. | २४९ | श्री. नारायण शंकर सुर्यवंशी. | डांगसौंदाणे | कळवण | नाशिक |
| ६६. | २५० | श्री. तुकाराम रामचंद्र देशमुख. | दगडी साकोडे | कळवण | नाशिक |
| ६७. | २८८ | श्री. बाळु रामा निंबारे | कोटंबी | कळवण | नाशिक |
| ३) प्रादेशिक कार्यालय, जुन्नर | | | | | |
| ६८. | ३०२ | श्री. पांडूरंग लक्ष्मण बोराडे. | तांबे | जुन्नर | पुणे |
| ६९. | ३०३ | श्री. मंगेश मारोती गांगड | खानगाव | जुन्नर | पुणे |
| ७०. | ३०४ | श्री.लक्ष्मण दुदा बगाड | उच्छील | जुन्नर | पुणे |
| ७१. | ३०५ | श्री.प्रकाश इगडू सूर्यवंशी | इंगळुन | जुन्नर | पुणे |
| ७२. | ३०८ | श्री. नामदेव निवत्ती रेंगडे | खामगाव | जुन्नर | पुणे |
| ७३. | ३०९ | श्री. तुकाराम बुधा लांगे | मढ | जुन्नर | पुणे |
| ७४. | ३१४ | श्री. बाळू वामन अदगो | कुडे बु. | खेड | पुणे |
| ७५. | ३१५ | श्रीम. ठकू बाळू लोखंडे | सेंदूर्ली | खेड | पुणे |
| ७६. | ३१८ | श्री.सखाराम शंकर सारोक्ते | कोहणे | अकोले | अहमदनगर |
| ७७. | ३१९ | श्री.किसन गोविंदा भांगरे | कोथळे | अकोले | अहमदनगर |
| ७८. | ३२२ | श्री.धनाजी तुकाराम लोहकरे | देवगाव | अकोले | अहमदनगर |
| ७९. | ३२७ | श्री. तळेकर द.व. | शेलद | अकोले | अहमदनगर |
| ८०. | ३२८ | श्री.मच्छिंद्र किसन सुपे | पिंपळगांव | अकोले | अहमदनगर |
| ८१. | ३४४ | श्री. निंबा सखाराम बुळे | रतनवाढी | अकोले | अहमदनगर |
| ८२. | ३४५ | श्री. विजय राजाराम भांगे | शेंडी | अकोले | अहमदनगर |
| ८३. | ३४६ | श्री. विठ्ठल लालु काटे | रंधाखुर्द | अकोले | अहमदनगर |
| ८४. | ३४७ | श्री. तुकाराम सामो खाडे | बारी | अकोले | अहमदनगर |
| ८५. | ३४८ | श्री. भरत नामदेव घणे | वारंघुशी | अकोले | अहमदनगर |
| ८६. | ३५३ | श्री. ढवळा नवशा साबळे | सांगवी | अकोले | अहमदनगर |
| ४) प्रादेशिक कार्यालय, नंदुरबार | | | | | |
| ८७. | ३६२ | श्री. काशिनाथ दाऊ वळवी | पथराई | नंदुरबार | नंदुरबार |
| ८८. | ४४९ | श्री. सोमु रामजी गावित | भरडू | नंदुरबार | नंदुरबार |
| ८९. | ४५१ | श्री. दिनकर नव्या गावित | इळदाणी | नंदुरबार | नंदुरबार |
| ९०. | ४८३ | श्री. मगन नुरा वळवी | खैरवे | नवापूर | नंदुरबार |
| ९१. | ४८६ | श्री किरण रोहिदास पावरा | प्रतापपुर | तळोदा | नंदुरबार |
| ९२. | ५२२ | श्री. यादव नंदा गावित | पिंजारझाडी | साक्री | धुळे |
| | | | | | |
| ५) प्रादेशिक कार्यालय, धारणी | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६) प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ | | | | | |
| ९३. | ५८० | श्री.नामदेव चि.आगाम<br>श्री. नामदेव का. तुमराम | तुळशी | माहुर | नांदेड |
| ९४. | ५८१ | श्री.दशरथ दत्ता कनाके | बाईबाजार | माहुर | नांदेड |
| ९५. | ५८३ | श्री.विनोद जलपत पेन्दोर | आष्टा | किनवट | नांदेड |
| ९६. | ६१० | श्री.दिनेश यादव बोरका | शिवनी | कळंब | यवतमाळ |
| ७) प्रादेशिक कार्यालय, चंद्रपुर | | | | | |
| ९७. | ७५१ | श्री. प्रभाकर मारोती बोडके | खडसंगी | चिमुर | चंद्रपुर |
| ९८. | ७५३ | श्री. पुरुषोत्तम शालिकराम शिमैजो | आडेगाव | चिमुर | चंद्रपुर |
| ९९. | ७५८ | श्री. देवाजी जानाजी कळवहे | मासळ बु. | चिमुर | चंद्रपुर |
| १००. | ७६० | श्री. पुंडलिक चौखे | वाहनगाव | चिमुर | चंद्रपुर |
| १०१. | ७६१ | श्री. नियालदास महादेव वलके | गिरगाव | चिमुर | चंद्रपुर |
| १०२. | ७६२ | श्री. राजेंद्र गुलाब दळांजे | कोजबी | चिमुर | चंद्रपुर |
| १०३. | ७६३ | श्री. शकिल सखाराम झाडे | भटाळा | चिमुर | चंद्रपुर |
| १०४. | ७६४ | श्री. चंद्रभान वरठे | चिंधिचेक | चिमुर | चंद्रपुर |
| १०५. | ७८३ | श्री. सुरज पांडूरंग घोडमारे | मोहली | नागभीड | चंद्रपुर |
| १०६. | ७८४ | श्री. मारोती रामदास उईके | गोविंदपूर | नागभीड | चंद्रपुर |
| १०७. | ७८५ | श्री. धनराज राजाराम बावणकर | बाळापूर | नागभीड | चंद्रपुर |
| १०८. | ७८६ | श्री.सदानंद विनायक बोरकर | वाढोणा | नागभीड | चंद्रपुर |
| १०९. | ७८७ | श्री. मुकूंदा देविदास टेंबुर्णे | जिवनापूर | नागभीड | चंद्रपुर |
| ११०. | ७८८ | श्री.राजेंद्र गुलाब धडांजे | कोसंबी | नागभीड | चंद्रपुर |
| १११. | ७८९ | श्री. सिताराम पारसराम मंडावी | सावरगाव | नागभीड | चंद्रपुर |
| ११२. | ७९८ | श्री. विजय मारोती चौधरी | चारगाव | वरोरा | चंद्रपुर |
| ११३. | ७९९ | श्री. एकनाथ रामाजी धोटे | सावरी | वरोरा | चंद्रपुर |
| ११४. | ८०० | श्री.अविनाश वामन खिरटकर | वडधा तु. | वरोरा | चंद्रपुर |
| ११५. | ८०५ | श्री. जनार्दन भिकाजी गावळे | मुरमाळी | शिंदेवाही | चंद्रपुर |
| ११६. | ८०६ | श्री. दिनेश यादव बोरकर | शिवणी | शिंदेवाही | चंद्रपुर |
| ११७. | ८०७ | श्री. प्रेमकुमार काशिनाथ डेंगे | पेळगाव | शिंदेवाही | चंद्रपुर |
| ११८. | ८०८ | श्री. राजेंद्र शामराव जांभाळे | कमळगाव | शिंदेवाही | चंद्रपुर |
| ११९. | ८०९ | श्री. प्रभाकर गोविंद रनदिवे | गडबोरी | शिंदेवाही | चंद्रपुर |
| १२०. | ८१० | श्री. मच्छिंद्र धिंगुजी रामटेके | नाचणभटटी | शिंदेवाही | चंद्रपुर |
| ८) प्रादेशिक कार्यालय, भंडारा | | | | | |
| १२१. | ६९६ | श्री.वसंत शा.पुरम | बोरगाव | देवरी | गोंदिया |
| १२२. | ६९७ | श्री. लक्ष्मण सोमा नाईक | डवकी | देवरी | गोंदिया |
| १२३. | ६९८ | श्री.प्रमलाला रसारामजी पियदे | चिचवाळा | देवरी | गोंदिया |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२४. | ६९९ | श्री. शामराव श्रीराम वटटी | डोंगरगाव | देवरी | गोंदिया |
| १२५. | ७०० | श्री.रमेश नारायणी ताराम | बरामजोक | देवरी | गोंदिया |
| १२५. | ७०३ | श्री. रियाज खान | ककोडी | देवरी | गोंदिया |
| १२७. | ७०५ | श्री.भुवनलाल ए. नरवरे | चिंचगड | देवरी | गोंदिया |
| १२८. | ७०६ | श्री.बळीराम रघुनाथ कानेवार | अंभोरा | देवरी | गोंदिया |
| १२९. | ७०७ | श्री. राजकुमार नामदेवराव हेवानू | सडक अर्जुनी | देवरी | गोंदिया |
| १३०. | ७१० | श्री. हरिचंद्र पा.कोहळे | वरसोडी | देवरी | गोंदिया |
| १३१. | ७११ | श्री. मानिक धावू मेंडे | खजरी | देवरी | गोंदिया |
| १३२. | ७१३ | श्री. दिलीप रामचंद्र राऊत | देवरी | देवरी | गोंदिया |
| १३३. | ७१५ | श्री. दगडू बारकू चौधरी | सालेकसा | सालेकसा | गोंदिया |
| १३४. | ७१६ | श्री. शंकरलाल भुलेजी मडावी | दरेकसा | सालेकसा | गोंदिया |
| १३५. | ७२० | श्री.हिरालाल पांडूरंक उईके | सातगाव | सालेकसा | गोंदिया |
| १३६. | ७२१ | श्री.लक्ष्मण काशीराम लोरे | कोटरा | सालेकसा | गोंदिया |
| १३७. | ७२४ | श्री.दिलीप बारकू वाघमारे | लोहारा | सालेकसा | गोंदिया |
| १३८. | ७२६ | श्री.ज्ञानदेव शामराव गहाणे | कनेरी | अर्जूनी मो. | गोंदिया |
| १३९. | ७२७ | श्री.नरेश विठठल आगमाने | पवनी | अर्जूनी मो. | गोंदिया |
| १४०. | ७२८ | श्री. दुर्गाप्रसाद एस. काकोडे | पांढरवाणी | अर्जूनी मो. | गोंदिया |
| १४१. | ७२९ | श्री.आसाराम पालेवाल | पालांदूर | अर्जूनी मो. | गोंदिया |
| १४२. | ७३० | श्री.एकनाथ बकारामजी रणे | केशोरी | अर्जूनी मो. | गोंदिया |
| १४३. | ७३१ | श्री. तानाजी शामराव इराम | इळदा | अर्जूनी मो. | गोंदिया |
| १४४. | ७३२ | श्री.तुलाराम राहू मारमऱ्या | बाराभाट | अर्जूनी मो. | गोंदिया |
| १४५. | ७९३ | श्री.रविंद्र दयाराम घरतकर | गोठणगाव | अर्जूनी मो. | गोंदिया |
| ९) प्रादेशिक कार्यालय, गडचिरोली | | | | | |
| १४६. | ८६१ | श्री. रामलाल देवजी हलामी | कुराळा | कुरखेडा | गडचिरोली |
| १४७. | ८६३ | श्री. देवीदास गंगाधर बन्सोडे | खेडेगांव | कुरखेडा | गडचिरोली |
| १४८. | ७६४ | श्री. वासुदेव तुळशीराम दुमार | रामगड | कुरखेडा | गडचिरोली |
| १४९. | ८६६ | श्री. दिलीप केवळराम चुरगाये | एंगलखेडा | कुरखेडा | गडचिरोली |
| १५०. | ८६९ | श्री. व्यक्टी लक्ष्मण नागिरकर | गेवर्धा | कुरखेडा | गडचिरोली |
| १५१. | ८७० | श्री.अशोक मडक्कूजी मडावी | देऊळगाव | कुरखेडा | गडचिरोली |
| १५२. | ८७१ | श्री.धरमदास वैसाकूजी उईके | वडेगाव | कुरखेडा | गडचिरोली |
| १५३. | ८७२ | श्री.निलाधर सि राम भोटसेकर | कुरखेडा | कुरखेडा | गडचिरोली |
| १५४. | ८७३ | श्री.उदवराम लक्ष्मण गहाणे | घाटी | कुरखेडा | गडचिरोली |
| १५५. | ८७४ | श्री.काशिनाथ लक्ष्मणजी दोणाडकर<br>श्री.यशोधन इंदरशहा मडावी | कढोली | कुरखेडा | गडचिरोली |
| १५६. | ८७५ | श्री. हिराजी गोविंद माकडे | गोठणगाव | कुरखेडा | गडचिरोली |
| १५७. | ८७६ | श्री. प्रभाकर बक्षी जुमनाके | सोनसरी | कुरखेडा | गडचिरोली |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५८. | ८७७ | श्री.केशव ज्ञानदेव किरसन | आंधळी | कुरखेडा | गडचिरोली |
| १५९. | ८८२ | श्री.धरमदास वैराचा उईके | वेडगाव | कुरखेडा | गडचिरोली |
| १६०. | ८९६ | श्री.सिताराम जयराम मडावी | सावरगाव | धानोरा | गडचिरोली |
| १६१. | ९०२ | श्री.बारीकराव राजूजी पदद | देलनवाडी | आरमोरी | गडचिरोली |
| १६२. | ९०५ | श्री.प्रल्हाद रायभान गेडाम | करुंडी,माळ | आरमोरी | गडचिरोली |
| १६३. | ९०९ | श्री.शेकूजी केवराम ताडाम | दवंडी | आरमोरी | गडचिरोली |
| | १०) उप प्रादेशिक कार्यालय, अहेरी. | | | | |
| १६४. | ८३० | श्री.आ.वि.सुमणी | सिरांचा | सिरोंचा | गडचिरोली |
| १६५. | ८३१ | श्री.रामाराव भंडारी | बामणी | सिरोंचा | गडचिरोली |
| १६६. | ८३२ | श्री.शंकर जि. टेहखरी | वडघम | सिरोंचा | गडचिरोली |
| १६७. | ८३४ | श्री.आ.व्हि.सुमणी | जामनपल्ली | सिरोंचा | गडचिरोली |
| १६८. | ८३६ | श्री.जयराम फंडकर | असरपल्ली | सिरोंचा | गडचिरोली |
| १६९. | ८३९ | श्री.शंकर जि.टेहरेकाजी | मुत्तापुर | सिरोंचा | गडचिरोली |
| १७०. | ८४१ | श्री. जयराम पांडकवडा | अंकिसा | सिरोंचा | गडचिरोली |

मा.अध्यक्ष यांनी प्रस्ताविक मांडुन वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी अनावधानाने काहीजणंची गैरसोय झाली असल्यास त्याबाबत दिलगीरी व्यक्त केली व याबाबत प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिल्यास पुढच्या वर्षी याबबत काही खबरदारी घेतली जाईल असे अश्वासित केले.

**विषय क्रमांक १ : मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीनेदुपारी १२:०० वाजता महामंडळाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नासिक च्या संपन्न झालेल्या सन २०२०-२१ च्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी वाचुन दाखविले. सदर इतिवृत्तास ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आणि खालीप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक १ :** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नासिक च्या दिनांक ३०.०९.२०२१ रोजी ऑनलाईन पध्दतीने दुपारी १२:०० वाजता संपन्न झालेल्या सन २०२०-२१ च्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तास सदरची सभा हि मान्यता देण्यात येत आहे.

सुचक : श्री.शंकर गुलेजी मडावी, सचिव, दरेकसा
अनुमोदक : श्री. दुर्गाप्रसात लक्ष्मण कोकोडे, संस्था प्रतिनिधी, पांढरवाणी.
ठराव बहुमताने मंजुर.

विषय क्रमांक ०२ : सन २०२१-२०२२ चे दिनांक ३१.०३.२०२२ अखेरचे वार्षिक हिशोबपत्रके, व्यापारी पत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद व वार्षिक अहवालास मंजूरी मिळणे बाबत.

महामंडळाचे आर्थिक वर्ष सन २०२१-२०२२ (दिनांक ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२२) या कालावधीचा आर्थिक अहवाल सादर करण्यात येत आहे.

महामंडळ राबवित असलेल्या उपक्रमाचे सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचे हिशोबपत्रके तयार करुन ती स्वतंत्र सात भागात दर्शविण्यात आलेली आहे.

१. एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेची एकत्रित परिणाम
२.आधारभूत किंमत खरेदी योजना
३. गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन)
४. किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)
५. खावटी कर्ज वाटप योजना
६. न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजना
७. खावटी अनुदान योजना

खावटी कर्ज वाटप व न्युक्लियस बजेट योजना शासन समप्रवर्तक निधीवर आधारीत असल्यामुळे सदर दोन्ही योजनांची आर्थिक हिशोबपत्रके स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहे.

सन २०२१-२०२२ मध्ये शासनाने खावटी अनुदान योजनाचे कीट महामंडळा मार्फत वाटप करण्यात आले, त्याचे समप्रर्वतक निधीवर आधारीत असल्यामुळे सदरचे योजनांचे आर्थिक हिशोब पत्रके अहवालात स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहे.

तथापी आधारभूत किंमत खरेदी योजना राज्य शासनाचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अभिकर्ता म्हणून महामंडळामार्फत राबविण्यात येत असल्यामुळे या योजनेतील खरेदी केलेल्या मालाचे हस्तांतरण शासनाचे निर्देशाप्रमाणे होत असल्यामुळे व त्यावर मिळणारा तात्पुरता स्वरुपात अनुषंगिक खर्चही (Incidential Charges) शासनाकडून निश्चित केलेल्या दराने अभिकर्त्यास दिला जातो त्यामुळे आधारभूत किंमत खरेदी योजनेचे लेखे वार्षिक अहवालात स्वतंत्र दर्शविण्यास आलेले आहेत.

तसेच गौणवनोपज किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (केंद्रशासन) या योजनेत तोटा आल्यास ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती होणार असल्यामुळे या योजनेचे हिशोबपत्रके स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

खरिप पणन हंगाम मध्ये केंद्र शासनाच्या किंमत स्थिर योजने अंतर्गत नाफेड मार्फत हमी दराने अभिकर्ता म्हणुन महामंडळा मार्फत तुर खरेदी करण्यात आली असल्याने व नाफेड कडुन याची प्रतीपुर्ती होणार असल्याने या योजनेचे हिशोबपत्रके सुध्दा स्वतंत्र दर्शविण्यात आले आहेत.

योजनानिहाय तरतूदीपूर्वी झालेला व्यापारी व निव्वळ नफा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | उपक्रमाचे नाव | व्यापारी नफा | व्यापारी तोटा | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना | ०.०० | (-) ७,०७,५९,१०३.९७ | ५,४१,६८,३९७.१५ |
| | सामान्य योजना | ०.०० | (-) ५३,०५०.०० | ५,३५,९९८.१८ |
| | एकूण अ | ०.०० | (-) ७०८१२१५३.९७ | ५,४७,०४,३९५.३३ |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | ३,८५,७९,३३४.४३ | ०.०० | ३,४८,३६,६५६.३३ |
| | एकूण ब | ३,८५,७९,३३४.४३ | ०.०० | ३,४८,३६,६५६.३३ |
| ३ | **केंद्र शासन गौणवनोपज किमान आधारभुत किंमत खरेदी योजना.** | | (-) २१,३४३.९० | (-) २७५४६.८० |
| ४ | **किंमत स्थिर योजना (नाफेड तुर)** | **०.००** | **०.००** | **०.००** |

१) एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेत खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत. आर्थिक वर्ष २०२१-२०२२ अखेर तरतूदी करणेचे प्रस्तावित करण्यात येत असून त्यास मान्यता मिळावी.

| अ.क्र | योजना | तपशिल | निव्वळ नफयातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित झालेल्या नफयातून मुख्य कार्यालय एकाधिकार खरेदी योजनेच्या लेख्यांमध्ये घ्यावयाची तरतूद | रिझर्व्ह फंड खाते (राखीव निधी) २५% | १,३५,००,०००.०० |
| | | भागभांडवल विमोचन निधी | १४,००,०००.०० |
| | | इमारत निधी १०% | ५४,७०,०००.०० |
| | | वस्तू विकास निधी २०% पैकी Adhoc तरतुद | ५,००,०००.०० |
| | | संशयित व बुडीत कर्ज निधी | १,००,००,०००.०० |
| | | कर्ज निवारण निधी | ५,००,०००.०० |
| | | व्यापारी चढ उतार निधी | ५,००,०००.०० |
| | | माहिती व तंत्रज्ञान निधी | ५,००,०००.०० |
| | **एकूण तरतूदीची रक्कम** | | **३,२३,७०,०००.००** |

वरीलप्रमाणे एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेतील एकत्रित केलेल्या तरतूदीस मान्यतेनंतर शिल्लक निव्वळ नफा रु.२,२३,३४,३९५.३३ (अक्षरी रु. दोन कोटी तेवीस लाख चौतीस हजार तीनशे पंच्यान्नव रुपये व तेहतीस पैसे मात्र) येतो.

**२) आधारभूत किंमत खरेदी योजनेत (PSS) खालीलप्रमाणे तरतूदी प्रस्तावित करण्यात येत आहेत.**

| अ.क्र | तपशिल | व्यापारी नफ्यातून तरतूदीची रक्कम | निव्वळ नफ्यातून तरतूदीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | संशयित व बुडीत खर्च तरतुद | ०.०० | ३,००,००,०००.०० |
| २ | अनुषंगिक खर्च तरतूद | ०.०० | ४५,००,०००.०० |
| | एकूण तरतूद | ०.०० | ३,४५,००,०००.०० |

३) खावटी कर्ज वाटप योजना, न्युक्लियस बजेट कर्ज वाटप योजना व खावटी अनुदान योजनेचे समवर्तक निधी व कर्ज येणे तपशिल खालीलप्रमाणे :

(रु.कोटीत)

| अ.क्र | योजना | समवर्तक निधी | कर्ज येणे |
|---|---|---|---|
| १ | खावटी कर्ज योजना | ४.९७ | निरंक |
| २ | न्युक्लियस बजेट योजना | २.०९ | ४.९७ |
| ३ | खावटी अनुदान योजना | ४१.०१ | निरंक |

उपरोक्तप्रमाणे सन २०२१-२०२२ चे हिशोबपत्रकात प्रस्तावित तरतूदी घेण्यास मान्यता मिळावी.
वरीलप्रमाणे तरतूदीनंतर शिल्लक नफा खालीलप्रमाणे :

| अ.क्र | योजना | शिल्लक नफा / तोटा |
|---|---|---|
| १ | एकाधिकार गौणवनोपज व सामान्य योजना | २,२३,३४,३९५.३३ |
| २ | आधारभूत किंमत खरेदी योजना | ३,३६,६५६.३३ |
| ३ | किमान आधारभूत किंमत खरेदी योजना (MSP MFP) निव्वळ तोटा | (-) २७,५४६.८० |
| ४ | किंमत स्थिर योजना (नाफेड तुर) (NAFED) | ०.०० |
| | एकुण नफा | २,२६,४३,५०४.८६ |

योजनानिहाय व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ३१.०३.२०२२ अखेरचे ताळेबंद पत्रक ४९ व्या वार्षिक अहवालात समाविष्ट आहे.

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेच्या एकत्रित व्यापारी व नफा तोटा पत्रकानुसार गोषवारा खालीलप्रमाणे :-

(रु.कोटीत)

| आरंभीसाठा, खरेदी खर्च व नफा | रक्कम | विक्री शिल्लकसाठा व उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|
| आरंभीसाठा | १३.७९ | विक्री | ३.३६ |
| खरेदी | ०.०० | इतर उत्पन्न | १५.२० |
| व्यापारी खर्च | ०.९१ | व्यवस्थापकीय अनुदान | २८.७२ |
| व्यवस्थापकीय खर्च | २८.७३ | शिल्लकसाठा | ४.२८ |
| घसारा (नियमीत) | २.६६ | | |
| तरतुदीपूर्वी नफा | ५.४७ | | |
| एकूण | ५१.५६ | एकूण | ५१.५६ |
| तरतूदी | ३.२४ | | |
| निव्वळ नफा | २.२३ | | |
| एकूण | ५.४७ | | |

एकाधिकार खरेदी योजना व सामान्य योजनेचे एकत्रित हिशोबपत्रकानुसार महामंडळास आर्थिक वर्षात निव्वळ नफा रु.५.४७ कोटी झालेला आहे. त्यामधून रु.३.२४ कोटीच्या तरतूदी केल्यानंतर शिल्लक नफा रु.२.२३ कोटी आहे.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व दिनांक ३१.०३.२०२२ अखेरचे ताळेबंद मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे, त्यास मंजूरी मिळावी.

उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व दि.३१.०३.२०२२ अखेरचे ताळेबंद मंजूरी करीता सादर करण्यात येत आहे, त्यास मंजूरी मिळावी. सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव क्रमांक ०२ : सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, आर्थिक वर्ष सन २०२१-२०२२ चा वार्षिक अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व दि.३१/०३/२०२२ अखेरचे ताळेबंद याची सदर सभा नोंद घेत असुन त्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- मा. श्री. मोहन गावंडे, सचिव संस्था करंजाळे

**अनुमोदक** :- मा. श्री. रामदासआनंदा बागुल, संस्था प्रतिनिधी शिंदेवाही

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०३ : सन २०२२-२०२३ या वर्षाचा मंजूर अर्थसंकल्पित निधी व सन २०२३-२०२४ च्या वार्षिक अंदाजपत्रकाला मान्यता देणे बाबत.**

केंद्र व राज्य शासनाकडुन महामंडळास भागभांडवल,अनूदान व अर्थसहाय्य प्राप्त होते. आर्थिक वर्ष २०२१-२०२२ व २०२२-२०२३ मधील लेखाशिर्षनिहाय मागणी अर्थसंकल्पित व प्रत्यक्ष प्राप्त तपशिलानुसार आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मधील मागणीचे अंदाजपत्रक खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

(रुपये लाखात)

| लेखाशिर्षक | वर्ष २०२१-२०२२ | | | वर्ष २०२२-२०२३ | | | २०२३-२४ अंदाज पत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी | अर्थसंकल्पित | प्रत्यक्ष | मागणी | अर्थसंकल्पित | प्रत्यक्ष | |
| **राज्य शासन :** | | | | | | | |
| भागभांडवल **(4425 0472)** | 5108.68 | 0.00 | 0.00 | 5108.68 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| सहाय्यक अनुदान **(2425 0853)** | 0.00 | 300.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| खावटी कर्ज **(2425 1493)** | 0.00 | 30000.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| गौणवनोपज **(MSP) २५% (2425 2426)** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एकूण | **5108.68** | **30300.00** | **0.00** | **5108.68** | **0.00** | **0.00** | **0.00** |
| **केंद्रशासन :** | | | | | | | |
| गौणवनोपज (वि.कें.अ.) **(2425 0862)** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| गौणवनोपज (MSP) ७५% (2425 2426) | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एकूण : | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूणांतः | 5108.68 | 30300.00 | 0.00 | 5108.68 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| राज्य शासन : | | | | | | | |
| व्यवस्थापकीय अनुदान (2425 0853) | 4267.26 | 3537.50 | 3212.50 | 5791.84 | 3400.00 | 1734.00 (apr.22 to Aug,22) | 5791.84 |
| एकूणः | 4267.26 | 3537.50 | 3212.50 | 5791.84 | 3400.00 | 1734.00 | 5791.84 |
| एकूणांत : | 9375.94 | 33837.50 | 3212.50 | 10900.52 | 3400.00 | 1734.00 | 5791.84 |

उपरोक्त प्रमाणे वर्ष २०२३-२०२४ मधील लेखाशिर्षनिहाय एकूण रक्कम रू.५७९१.८४ लक्षच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेसाठी सादर.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक ०३ :** सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, सन २०२२-२०२३ करीता अर्थसंकल्पित झालेला निधी रु.३४००.०० लक्ष चा निधी राज्य व केंद्र शासना कडुन प्राप्त करुन घेण्यास, तसेच सन २०२३-२०२४ चे अदाज पत्रक रु.५७९१.८४ लक्ष रक्कमेस सदर सभा मान्यता देत आहे. भागभांडवल, सहाय्यक अनुदान व खावटी कर्ज योजना, किमान आधारभुत किंमत खरेदी योजना (गौणवनोपज) प्रस्ताव शासनास सादर करण्यास व यासंबधीचे पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात येत आहेत.

सुचक :- **मा.** श्री.शंकर गुलेजी मडावी, सचिव, दरेकसा

अनुमोदक **:- मा.** श्री.मुकुंद देविदास टेभूर्णे, संस्था प्रतिनिधी, जिवनापूर

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०४ : सन २०२२-२०२३ वर्षासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व लेखापरिक्षक शुल्क निश्चित बाबत.**

सहकार कायदा १९६० च्या ९७ व्या घटना दुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड एम व महाराष्ट्र शासन अध्यादेश दि.१४.०२.२०१३ ला अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणा शासन पत्र क्र. सगृयो-२०१३/३८९/प्र.क्र.५५/१४-स, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई दि.०४.०३.२०१३ अनुसार तसेच सहकार कायदा १९६० चे कलम ७५ (२अ) नुसार "प्रत्येक संस्था आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधुन, कलम ८१ मध्ये निर्धारीत केल्याप्रमाणे लेखापरिक्षकाची किंवा लेखापरिक्षण करणाऱ्या संस्थेची चालु वित्तीय वर्षासाठी नेमणुक करायची आहे.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन निर्णय. क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ व क्र.सगृयो-२०१२/मुमंस१७/प्र.क्र.३६/१४-स मंत्रालय, मुंबई दि. २९/१०/२०१४ मधील अ.क्र. १० मध्ये म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक चे शुल्क खालील प्रमाणे नमुद आहे.

| Sr. No. | Type of Society | As per new notification | | |
|---|---|---|---|---|
| | | Scale of Fees | | |
| | | Details of Parameters | Amount as per Parameters | Maximum amount limit |
| 10 | Maharashtra State co-operative Tribal Development Corporation Ltd. | Procurement & Processing of per quintle | | 2500000 |
| a | For Government Procurement | | 0.50 | |
| b | For Service Supply | Per unit | 10000 | |
| c | In liquidation | | | 20000 |

उपरोक्त शासन निर्णयाला मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद यांचे दि.०२/०५/२०१६ च्या निकाला नुसार स्थगिती (Stayed) आहे.

महामंडळाचे सन २०२२-२०२३ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता नाशिक, पालघर, ठाणे, पुणे, नंदुरबार, धुळे, आमरावती, यवतमाळ, नागपुर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपुर, औरंगाबाद, अ.नगर येथिल विषेश लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१, यांना पत्र क्र. जा. क्र. आविम / लेखापहरीक्षण / २०२२-२०२३/ २९१९ / २०२२. नाशिक-२ दि.२४/०८/२०२२ नुसार सन २०२२-२०२३ चे संवैधानिक लेखापरीक्षण करेणे बाबत पत्र देण्यात आले होते. करीता इच्छुक विषेश लेखापरीक्षक, सहकारी संस्था यांना आपले अर्ज / संमत्ती पत्र या कार्यालयस दि.०५/०९/२०२१ पुर्वी पठवणे बाबत सुचित केले होते. करीता दि.१०/०९/२०२२ अखेर विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१ यांचा अर्ज / संमत्ती पत्र प्राप्त झालेले नाहीत.

सन २०२२-२०२३ महामंडळाचे आर्थिक वर्षाचे सतत व समवर्तक (Current & Con-Current) पध्दतीने संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.१०/०९/२०२१ अखेर खालील प्रमाणे सनदी लेखापाल व सनदी लेखापाल संस्था यांचे अर्ज प्राप्त झालेले आहे.

| अ. क्र. | सहकार पॅनल क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | सहकार पॅनल वर्ग |
|---|---|---|---|
| १ | १४२०२ | के.पी.एन. ॲण्ड कंपनी, नाशिक | अ-१ |
| २ | १७८२७ | ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, पुणे. | अ-१ |
| ३ | १४३५३ | वामु ॲण्ड असोसिएट, पुणे. | अ-१ |
| ४ | १४३७२ | मंत्री मालु ॲण्ड असोसिएट, पुंणे | अ-१ |
| ५ | १७४२५ | धोंगडेपाटील गोधाणी ॲण्ड कंपानी, नाशिक | अ-१ |
| ६ | १०११४४३ | तुषार बाजीराव पगार, नाशिक | अ-१ |

उपरोक्त तपशिला प्रमाणे सदर संस्था हया सन २०२२-२०२३ संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता इच्छुक आहे याबाबत तपशिल खालिल प्रमाणे.

"दि.२९/१०/२०१४ च्या शासन निर्णयातील अट क्र.२(२) एक लेखापरीक्षक एकाच संस्थेचे सलग तीन वर्षापेक्षा जास्त मुदती साठी लेखापरीक्षण करु शकत नाही." असे नमुद आहे. यापुर्वी ज्या सनदी लेखापाल फर्मने लेखापरिक्षण केले आहे त्याच्या तपशिल शेरा रकान्यात नमुद केला आहे.

प्राप्त झालेल्या सनदी लेखापालांचा अर्जाचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | लेखापरीक्षकाचे नाव | पॅनल क्र. | सहकार पॅनल वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | के. पी. एन. ॲण्ड कंपनी, नाशिक | १४२०२ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| २ | ए. एस. के. वाय. ॲण्ड कंपनी, पुणे. | १७८२७ | अ-१ | सन २०१८-२०१९, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२. |
| ३ | वामु ॲण्ड असोसिएट, पुणे. | १४३५३ | अ-१ | सन २०१५-२०१६, सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८. |
| ४ | मंत्री मालु ॲण्ड असोसिएट, पुणे | १४३७२ | अ-१ | यापुर्वी लेखापरीक्षण केलेले नाही. |
| ५ | धोंगडेपाटील गोधाणी ॲण्ड कंपानी, नाशिक | १७४२५ | अ-१ | सन २०१९-२०२० |
| ६ | तुषार बाजीराव पगार, नाशिक | १०११४४३ | अ-१ | सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४ सन २०१४-२०१५ |

करीता महामंडळाचे उपरोक्त क्र. १ व ६ पैकी एका सनदी लेखापरीक्षकाची सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरीता लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविण्याचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास सादर.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक ०४ :-** सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, सन २०२२-२०२३ या वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी तुषार बाजीराव पगार नाशिक यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासन निर्णया नुसार लेखापरीक्षण फी निश्चित करण्यात येत आहे.

**सुचक :- मा.श्री. कैलास बोरसे, सचिव, संस्था डांगसौदाणे**

**अनुमोदक :- मा.श्री. रामदास सोमा लहारे, संस्था प्रतिनिधी, शिरसगाव**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ०५ : सन २०१९-२०२० चे संवैधानिक लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करुन स्विकृत करणे बाबत.**

केंद्र शासनाने केलेल्या ९७ व्या घटनादुरुस्तीतील अनुच्छेद २४३ झेड. एम नुसार व राज्य शासनाचे अध्यादेश दि.१४/०२/२०१३ अनुसरुन कलम ८१ मधील सुधारणानुसार महामंडळाचे सहकार कायद्यान्वये बंधनकारक असलेले संवैधानिक लेखापरिक्षण सहकार आयुक्त यांच्या नामतालिकेवरील "अ" सुचित समाविष्ठ असणारे सनदी लेखापाल धोंगडेपाटील गोधानी ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांची सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करणे करीता दि.२९.०९.२०१९ च्या संचालक मंडळ सभाचा ठराव क्र.४५ व दि.३०.०९.२०१९ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव क्र.५ पारीत करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने व मुख्य कार्यालयाचे आदेश क्र. आविम/लेखा-२/लेखापरिक्षण/४६५५/२०१९ नाशिक दि.०६.१२.२०१९ अन्वये नेमणुक करण्यात आली होती.

महामंडळाचे दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीचे लेखापरिक्षण पुर्ण झाले आहे. त्याचा लेखापरिक्षण अहवाल मुख्य कार्यालास दि.२७/०५/२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालातील

महत्वांच्या मुद्याचा गोषवारा संचालक मंडळाच्या सभेसाठी व्यवस्थापनाचे अभिप्राय मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

सन २०१९-२०२० या वर्षात महामंडळास "ब" वर्ग मिळाला आहे. प्राप्त लेखापरिक्षण अहवालाच्या गोषवाऱ्यातील मुद्यास मान्यता मिळावी. तथा सदरच्या लेखा परीक्षण अहवालाची दोष दुरुस्ती विहीत कालावधीत करुन आगामी संचालक मंडळाच्या सभेत सादर करण्यात येईल व सदरचा लेखापरीक्षण अहवाल आगामी वार्षिक सर्व साधारण सभेत सादर करण्यात येईल, करीता मान्यतेस सादर.

सदरचा विषय महाव्यवस्थापक (वित्त) यांनी सभे समोर सादर केला. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक. ०५** :- सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येतो कि, सन २०१९-२०२० चे सवैधानिक लेखापरीक्षक थोंगडेपाटील गोधानी अँण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांचे कडुन लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालातील अनियमितता व अक्षेप / हरकती बाबत प्रशासनाने नियम संगत कार्यवाही करावी, याबाबीस अधिन राहुन लेखापरीक्षण अहवाल स्विकृत करण्यात येत आहे. त्याचा दोष दुरुस्ती अहवाल विहीत "ओ" नमुण्यात व विहीत कालावधीत पुर्ण करुन संचालक मंडळाच्या मान्यतेने सादर करण्यात यावा. करीता सदर सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- **मा.श्री. सदाशिव गावित, सचिव, संस्था वणी**

अनुमोदक :- **मा.श्री. ओमानंद हुशार घारे, संस्था प्रतिनिधी, इगतपुरी**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

वरील प्रमाणे ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मा.मंत्री महोदय यांचे समक्ष विषयावर सांगोपांग चर्चा होवून वरील ठराव पारित करणेत आले आहेत.

**विषय क्रमांक ०६ :- मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.**

मा.अध्यक्ष यांनी संस्था सचिव /संस्था प्रतिनिधी यांनी विभागवार आपले प्रश्न मांडणे बाबत सुचना केल्या त्याप्रमाणे उपस्थित आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थाचे प्रतिनिधि यांनी खालीलप्रमाणे संस्था स्तरावर येणाऱ्या अडी-अडचणी मांडल्या

१. **श्री. शंकर मडावी सचिव, दरेकसा** :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था दरेकसा, सालेकसा जि. गोंदिया यांनी संस्थेच्या विविध प्रश्नांविषयी मुददे उपस्थित केले. त्यात प्रामुख्याने संस्थाकडे कोणताही निधि शिल्लक नसून संस्थावर आलेल्या घटी माफ करणेबाबत अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ तथा मंत्री आदिवासी विकास विभाग मा. ना. श्री. विजय कुमार गावित यांना विनंती केली. संस्थाच्या आर्थिक अडचणी, कर्मचा-यांचा पगाराचा प्रश्न, संस्थेकरीता गोदाम याकरीता तत्काळ संस्थांचे खरेदी कमिशन अदा करण्यात यावे. मागील १५ वर्षापासुन संचालक बॉडी मध्ये बदल केलेले नाही, संचालक निवडणुक घेण्यात आलेली नाही.

२. **श्री. कैलास बोरसे, डांगसौदाणे** :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्या आर्थिक सक्षमीकरण विचारणा केली. श्री कैलास बोरसे सचिव आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था डांगसौदाणे जि. गोंदिया यांनी संस्थाचे २००९ ते चालु हंगामापर्यंत थकीत वसुली असुन ते अदयापपर्यंत शासनाने माफ केलेले नाही. यामुळे जिल्हा बॅका आदिवासी संस्थाना कर्ज देत नाहीत.

काही जिल्हयांमध्ये १ व्यक्ति ३ ते ४ संस्थांचे सचिव असुन आर्थिक अडचणीमुळे संस्था चालविणे अवघड झालेले आहे त्यामुळे सर्व संस्थाचे आर्थिक सक्षमीकरण करुन त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लावावे तरच संस्था व्यवस्थित कामकाज करतील त्यामुळे शेतक-यांचा पण फायदा होईल.

३. श्री. शंकर मडावी सचिव, दरेकसा :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था यांचेवर एकुण भंडारा, गडचिरोली, गोंदीया व इतर सर्व जिल्हयात मिळुन आजपर्यंत १५६ कोटी इतकी घटतुट रक्कम वसुली बाकी असुन सदर रक्कम संस्थाकडुन वसुलपात्र आहे. परंतु संस्थापातळीवर ४ वर्षापर्यंत धानसाठा पडुन असतो, महामंडळाकडुन माल लवकर उचल होत नाही, सदर धानसाठा उचल करणेची जबाबदारी महामंडळाची असुन त्याला विलंब होतो मग आलेल्या घटतुटीची वसुली संस्थेवर का? ही बाब संस्थावर अन्यायकारक असुन तत्काळ १५६ कोटी इतकी घटतुट रक्कम माफ करण्यात येऊन संस्था कमिशन अदा करण्यात यावे.

४. **श्री. हरीश काळे सचिव, परसोंडी :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था परसोंडी यांनी संस्थांनी घेतलेल्या गोदामाचे गोदामभाडेबाबत मुद्दा उपस्थित केला. खरेदी केलेला धानसाठा साठवणुकीसाठी घेतलेल्या गोदामाचे गोदामभाडे २.४० रुपये प्रमाने देखील अदयापपर्यंत प्राप्त झालेले नाही, यामुळे गोदामभाडे अदा करता आलेले नाही. संस्थाना बँक कर्ज देत नाही, त्यामुळे संस्थाना कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नसल्याने मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागतो.

५. **श्री. राजकुमार येडाव सचिव, सडकअर्जूनी :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था सडकअर्जूनी यांचेअंतर्गत ४ आदिवासी संस्था समाविष्ट असुन सदर संस्थेंनी धानसाठा साठवणुकीसाठी जागेची व्यवस्था नसल्याने ओटयावर धान साठवणुक केला होता. यामुळे धानसाठा सुरक्षित रहात नसुन वातावरणामुळे धानाची गुणवत्ता खराब होण्याची शक्यता असते. मा. अध्यक्षांनी ४ संस्थेपैकी कुठेही जागेची व्यवस्था करुन दिल्यास गोदाम बांधुन घेता येईल, याबाबत संदर वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जागा उपलब्धततेसाठी विषय मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

६. **श्री. प्रल्हाद वरठे सचिव, कोहमारा :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था कोहमारा यांचेअंतर्गत ५ आदिवासी संस्था समाविष्ट असुन सदर संस्थेंनी धानसाठा साठवणुकीसाठी जागेची व्यवस्था नसल्याने ओटयावर धान साठवणुक केला होता. मा. अध्यक्षांनी जागा अथवा गोदाम उपलब्ध करून दयावे, सर्व लाभार्थ्यांना खावटी किट भेटले नाही यामुळे वाटप अपुर्ण राहीले आहे. ज्या ठिकाणी संस्थेच्या मालकीची जागा आहे, त्याठिकाणी गोदाम बांधकाम महामंडळाने करावे.

७. **श्री. ईते सचिव, रतनवाडी :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था रतनवाडी यांनी अहमदनगर जिल्हयात सहयाद्रीमध्ये हिरडयाचे खुप मोठया प्रमानात उत्पन्न होते, हिरडयाचे महत्व वाढविण्यात यावे. हिरडा खरेदी संस्थेमार्फत राबविल्यास संस्थेला चालना मिळु शकते. संस्थेला हिरडा खरेदीसाठी मंजुरी मिळावी.

८. **श्री. दिलीप वाघमाडे सचिव, वाडा :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था वाडा यांच्या कार्यक्षेत्रामध्ये खरीप तसेच रब्बी धान खुप आहे, परंतु शासनाकडुन संस्थेला कोणतीही मदत करण्यात आलेली नाही, गोदामासाठी ग्रामपंचायत अंतर्गत जागा ऊपलब्ध असुन ग्रामपंचायतचा ना हरकत दाखला प्राप्त आहे, निधि ऊपलब्ध झाल्यास बांधकाम करता येईल व खरेदीकरीता गोदामाची सोय करता येईल. तसेच खरेदी सुरु झालेनंतर बारदाना ऊशीरा येतो, शेतकऱ्याला बारदानाचे पैसे विलंबाने मिळतात. यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होते, पुढील हंगामात खरेदीपुर्वी सर्व व्यवस्था करण्यात यावी.

९. **श्री. ऊध्दव गहाणे सचिव, घाटी :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था घाटी यांना घाटी गाव कुरखेडा अंतर्गत १ हेक्टर जागा प्राप्त झालेली असुन सदर जागेचे सिमांकन झालेले आहे, संस्थेने सदर जागेवर झाडासाठी रुपये ८०,०००/- भरलेले असुन शेडसाठी (रुपये ७ लाख) कर्ज काढुन खर्च केलेला आहे. यामुळे संस्थेची घट कमी झालेली आहे, तथापि मुख्य रस्त्याकडुन शेडकडे येणारा रस्ता खराब झालेला असुन दुरुस्तीसाठी आदिवासी विभागाकडुन निधी ऊपलब्ध करण्यात यावा. बाजारपेठा लांब असल्यामुळे शेतकऱ्यांना खते आणण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागतो, यासाठी संस्थेला जागेवर खते व बि-बियाणे विक्रीचे परवाने देण्यात यावे.

१०. **श्री. तुकाराम मार्गे सचिव, सडकअर्जूनी, श्री. ज्ञानदेव डहाणे सचिव, कन्हेरी :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था सडकअर्जूनी, कन्हेरी यांनी २०२०-२१ ते २०२१-२२ मध्ये एकुण ९६००० क्वि. धान खरेदी केला पण अदयापपर्यंत खरेदी कमिशन मिळाले नाही. सदर हंगामात खरेदीकरीता बारदाना दिलेला नाही त्यामुळे शेतकऱ्यांचा बारदाना घेतला परंतू अदयापपर्यंत बारदानाचे पैसें किंवा बारदाना मिळालेला नाही यामुळे खरेदी दरम्यान संस्थेची आणी शेतकऱ्यांची गैरसोय झाली. खरेदी कमिशन तसेच बारदानाचे पैसें याची अदायगी करण्यात यावी.

११. **श्री. सदाशिव गावित सचिव, वणी :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था वणी यांनी सांगितले की, आदिवासी संस्था या महामंडळाच्या भागधारक आहेत, सध्या अनिष्ट तफावतीच्या रकमामुळे आर्थिक अडचणीत आलेल्या आहेत, यामुळे संस्था वाचविणेसाठी महामंडळाने प्रयत्न करावा. महामंडळ व संस्थांचा कारभार जोमाने चालावा यासाठी मा. अध्यक्षांनी पुढाकार घ्यावा, संस्थांचे व्यवस्थापन महामंडळाकडे वर्ग करावे व संस्थेच्या कर्मचाऱ्यांना पगार महामंडळाने दयावा, २००८ पासुन संस्थावर कर्ज असुन दरवर्षी मुद्दल वाढ होत आहे, विकास संस्थाना शेकडा ५ पैसे दराने तर आदिवासी संस्थाना शेकडा १० पैसे दराने कर्ज मिळते, अनावश्यक ऑडीट फी दयावी लागते यासाठी महामंडळाने ऊपाययोजना करावी व संस्थांचे कर्ज खांदयावर घ्यावीत.

१२. **श्री. सोमु गावित सचिव, भरडू :-** आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था भरडू यांनी सांगितले की, आदिवासी संस्थेच्या सक्षमीकरणावर भर देण्यात यावा. संस्थांना शीतगृह, मालवाहतुक, डेरी, पोल्ट्री यासारखे व्यवसाय देण्यात यावे.

१३.श्री. मोहन गावंडे सचिव, करंजाळे :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था करंजाळे यांनी सांगितले की, महामंडळाकडे २०१६ पर्यत एकाधिकार खरेदी योजना होती, सदर योजना पुन्हा चालु करून संस्थामार्फत चालविण्यात यावी. संस्थाना योजनेसाठी व्यवस्थापकीय अनुदान देण्यात यावे.

१४.श्री. लक्ष्मण नाईक सचिव, गडचिरोली :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था गडचिरोली यांनी सांगितले की, २००६ पासुन आदिवासींच्या जमिनींना वनपट्टा मिळालेला नाही, त्यामुळे जमिनी आदिवासींच्या नावावर होत नाहीत. याबाबत कार्यवाही करावी. तेंदुपत्ता या गौणवनोपजला महत्व देण्यात यावे आणी तेंदुपत्त्याचा भाव वाढविण्यात यावा.

१५.श्री. सखाराम सारुक्ते सचिव, कोहले :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था कोहले यांनी सांगितले की, हंगाम २०२०-२१ च्या आधारभुत धान खरेदीला बोनस दिलेला नाही. तसेच मागील खावटी कर्ज माफ करण्यात आले परंतू कार्यालयीन व्यवहाराची नोंद घेतलेली नाही त्यामुळे संस्थेवर आजही कर्ज दिसत आहे. याची नोंद घेण्यात यावी. अजीर्ण संस्था मुल्यांकन करून अधिग्रहीत करण्यात याव्यात.

१६.श्री. राजु सुतार सचिव, उपराळा :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था उपराळा यांनी सांगितले की, आमची संस्था विक्रमगड तालुक्यात असुन संस्थेकडे ऑफिस आहे पण गोदामाकरीता जागा नसल्यामुळे गोदामाकरीता जागा किंवा गोदाम ऊपलब्ध करुन देण्यात यावे.

१७.श्री. सचिव, दुधनोली :- आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था दुधनोली संस्थाना बि-बियाणे, खते, शेती अवजारे विक्रीकरीता परवानगी देण्यात यावी, संस्था कार्यालयाचे भाडे व कर्मचाऱ्यांचे वेतन महामंडळामार्फत देण्यात यावे.

महामंडळाचे संचालक मा. श्री. मधुकर काठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. (मंत्री तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ मा. ना. श्री. विजय कुमार गावित यांचे स्वागत केले) सर्व संचालक सदस्य, व्यवस्थापकीय संचालक यांना धन्यवाद देऊन उपस्थित संस्था सदस्य यांना अभिवादन केले. कोरोनामुळे मागील २ वर्षे सभा घेण्यात आलेली नाही, २ वर्षानी सभा होत आहे. आदिवासी संस्था या आदिवासी विकास महामंडळाच्या कणा आहेत परंतु संस्थांना न्याय मिळत नाही. मा. अध्यक्षाकडुन संस्थाना खुप अपेक्षा आहेत, मा. अध्यक्ष आदिवासी विकास विभागाचे पुन्हा मंत्री झालेले असुन त्यांनी आदिवासी समाजाची नाडी ओळखली आहे तसेच संस्यांच्या अडी-अडचणी माहित आहे. त्यामुळे आदिवासी संस्थेच्या सर्व मागण्या पुर्ण होतील अशी अपेक्षा करतो, असे सांगितले व आपले मनोगत संपविले.

महामंडळाचे संचालक मा. श्री. सुनील भुसारा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आदिवासी संस्थांच्या अपेक्षा पुर्ण करणेसाठी मा.मंत्री महोदयांना विनंती केली, संस्थांना सक्षमिकरण करण्यासाठी, पुरक व्यवसाय करण्यासाठी सर्व परवाने देण्यात यावे असे सांगितले. मा.बबनराव पाचपुते यांची काष्टी सेवा संस्थेचे उदाहरण दिले, सदर संस्थेचे कामकाज ऊतकष्ट आहे, त्याप्रमाणे सर्व संस्था चालकांनी कामकाज करावे. यानंतर मा.संचालक श्री.सुनील भुसारा यांनी आदिवासी विकास विभागाच्या खर्चातुन १ कॉम्प्युटर सेट प्रत्येक संस्थेला

देण्यात यावे असे सांगितले. त्यानंतर संचालक सदस्यांची संरचना बदलनेबाबत मा. उच्च न्यायालय येथे दावा सुरु असुन न्यायालयीन प्रक्रीयेमुळे निवडणुक लांबली आहे असे सांगुन आपले मनोगत संपविले.

महामंडळाचे संचालक मा. श्री. भरतलाल दुधनाग यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुरवातीला मंत्री तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ मा. ना. श्री. विजय कुमार गावित यांचे स्वागत केले, सर्व संचालक सदस्य, व्यवस्थापकीय संचालक यांना धन्यवाद देऊन उपस्थित संस्था सदस्य यांना अभिवादन केले. एकाधिकार खरेदी योजना महामंडळाची आहे, २०२०-२१ पर्यत आधारभुत खरेदी योजना राबविल्यामुळे मोठया प्रमानात घटतुट आलेली आहे, नवेगावबांध येथील १ करोड ४० लक्ष कमिशन देणे आहे ते तात्काळ देण्यात यावे. आलेल्या घटींची जबाबदारी महामंडळाची आहे, संस्थेवर कार्यवाही होते. संस्था खरेदी राबवुन महामंडळाचेच काम करत आहेत. मा. अध्यक्ष यांनी महामंडळ व संस्थेला सक्षम बनविणेकरीता उपाययोजना करावी.

सभेच्या शेवटी मंत्री तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ मा. ना. श्री. विजय कुमार गावित यांनी आपले मनोगत करताना सर्वप्रथम आदिवासी महिला श्रीमती मुर्मू मॅडम देशाच्या राष्ट्रपती झाल्यामुळे अभिनंदनाचा ठराव पास करण्यात आला. आदिवासी क्रांतिकारी बिरसा मुंडा गौरव दिन १५ नोव्हेंबर ला मोठया प्रमानात साजरा करावा अश्या सुचना दिल्या.

शेतकऱ्यांच्या विविध समस्या आहे. बाजारपेठ, शिक्षणाचा अभाव इत्यादीमुळे विविध गौणवनउपज व शेतमालाला योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे हे सर्व महामंडळ खरेदी करेल या उद्देशाने महामंडळाची स्थापना केली आहे. सुरवातीला एकाधिकार योजना राबवली, संस्थाना पुरक व्यवसाय करण्यासाठी विविध परवाने दिले. मागच्या कार्यकाळात महामंडळाची परिस्थिती बरी होती परंतु सध्याची परिस्थिती पाहता महामंडळ तोटयात आहे. आधारभुत किंमत खरेदी महामंडळामार्फत राबविली जाते परंतु खरेदी झालेला माल वेळेत ऊचल झाला नाही तर येणारी घट-तुट ही देखील महामंडळावर लादली जाते याबाबत पुढच्या काळात निर्णय घेणे गरजेचे आहे. सदयस्थितीत महामंडळाची परिस्थिती वाईट आहे, याबाबत चर्चा करुन निश्चित मार्ग काढला जाईल. मागच्या वेळेला आचारसंहीता लागल्यामुळे संस्थांचे कर्ज माफ झाले नाही. यामुळे संस्थांकडे दुर्लक्ष झाले, संस्थाकडे जमीन नाही, खातेफोड नाही यामुळे कर्ज माफ झालेले नाही. यातुन मार्ग काढु तसेच खावटी अनुदान योजनेत किट वाटप कोणाकोणाचे बाकी आहे त्यांची यादी दिल्यास, १००% पुर्ण किट वाटप केले जाईल. यापुढे पुर्वीच्या प्रमाने ७०% व ३०% च्या फॉर्मुल्याप्रमाणे खावटी कर्ज वाटप योजना पुर्णपणे महामंडळामार्फत राबविण्यात येईल, आधारभुत खरेदीमध्ये मोठया प्रमानावर घट-तुट येते, सदर घट-तुट महामंडळ भरु शकत नाही. यापुढे धान खरेदी आधारभुत मध्ये करावी किंवा नाही याबाबत विचार करावा लागेल, आधारभुत खरेदी योजने व्यतिरिक्त गौणवनऊपज खरेदी करुन जे वनधन जिथे पिकते तिथेच त्या मालावर प्रक्रिया करुन विक्री करणेसाठी लहान युनिट उभारता येतील यासाठी निधी पुरविण्यात येईल, हे सर्व कामकाज महामंडळामार्फत करण्यात येईल. यामुळे महामंडळ सक्षम होईल, शेती अवजारे खते पुरविणे, किराणा दुकान चालवणे इत्यादी सारख्या योजना बचत गटांना, संस्थाना देऊन सरकारी जागा, आश्रमशाळा,

वसतीगृहे या जागी गोदामासाठी जागा ऊपलब्ध करुन देता येतील. यामुळे संस्थांचा फायदा होईल. आपल्या संस्था आपणच बळकट करणे आवश्यक आहे. सर्व आदिवासी मजुरांचे १००% विमा काढण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार, संचालक मंडळाची लवकरच निवडणुका घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

शेतकऱ्यांकडून आधारभुत योजनेत धान खरेदी केल्यानंतर तात्काळ पैसे देण्याची कार्यवाही करावी. प्रलंबित असलेली बाकी सर्वांना तात्काळ दयावी. सर्व आदिवासी शेतकऱ्यांचा विमा काढयाची कार्यवाही लवकर शासन स्तरावरुन करण्यात येईल. आदिवासी भागातील सर्व पाडे, वाडया वसत्यांना जोडण्यासाठी नियोजन सूरु असून लवकरच सदरची कार्यवाही केली जाईल.

सर्व संस्थांनी नविन कल्पना सांगाव्यात, एकमेकांना सहकार्य करुन संधीचा फायदा घ्या. यापुढे संस्थांची प्रगती व उध्दार व्हावा यासाठी शुभेच्छा देतो, पुढच्या वर्षी आदिवासी विकास महामंडळाला ५० वर्ष पुर्ण होत आहेत परंतु अदयापपर्यंत महामंडळाची परीपुर्ण प्रगती झालेली नाही. आता महामंडळाची प्रगती करणेकरीती जे जे शक्य आहे ते सर्व करुया यासाठी सर्वांना शुभेच्छा देतो असे बोलुन मंत्री तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ मा. ना. श्री. विजय कुमार गावित यांनी सभा संपली असे घोषित केले.

महाव्यवस्थापक (विपणन)　　महाव्यवस्थापक (वित्त)　　महाव्यवस्थापक (प्रशासन)

व्यवस्थापकीय संचालक,

मा.अध्यक्ष,
म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,
नाशिक.